सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ)
पदावरुन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
(गट-अ) या पदावर पदोन्नती व पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्र. पसंप्र-२०१८/प्र.क्र.२७४/पदुम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

शासन आदेश :-

पशुसंवर्धन विभागातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट-अ (वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ५७००) या संवर्गातील अधिकाऱ्यांना उपायुक्त पशुसंवर्धन गट-अ (वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००) या पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्रमांक ४ येथे नमूद ठिकाणी करण्यात येत आहे :-

अ.क्र.	सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांचे नाव	जाती प्रवर्ग	उपायुक्त पशुसंवर्धन या पदावर पदोन्नतीनंतर पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३	४
१.	डॉ. धुमाळ विजय विनायकराव, सहाय्यक आयुक्त पसं, गुणनियंत्रण,गोरेगांव,मुंबई.	खुला	जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, ठाणे
२.	डॉ. परिहार अंकुश तुलशिराम, सहाय्यक आयुक्त पसं, ता.ल.प.स.चि, कराड,जि.सातारा	खुला	जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सातारा
३.	डॉ. बोरकर भुवनेश्वर शामराव, सहाय्यक आयुक्त पसं, ता.ल.प.स.चि,उमरेड,जि.नागपूर.	इ.मा.व	जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, वाशिम
४.	डॉ. जाधव देवेंद्र सुरेश, सहाय्यक आयुक्त पसं, ता.ल.प.स.चि,कोरेगांव,जि.सातारा	खुला	उपआयुक्त पशुसंवर्धन, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे
५.	डॉ. पसरटे सुनिल चंदन, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, ता.ल.प.स.चि, मंठा, ता.मंठा, जि.जालना.	अनु.जाती.	जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, उस्मानाबाद.
६.	डॉ. केंडे शैलेश श्रीकांतराव, सहाय्यक आयुक्त पसं, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे.	खुला	जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, लातूर

२. सदर पदोन्नत्या तदर्थ व पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निवळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा ज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञेय याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ब यांनी दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये

दिलेल्या सुचना नुसार देण्यात येत आहेत. तसेच सदर पदोन्नत्या हया उपआयुक्त पशसंवर्धन या पदावर पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालय तसेच मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरणामध्ये विविध प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३. उपआयुक्त पशुसंवर्धन या पदावर पदोन्नती नंतर पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी त्यांच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी. तसेच संबधित अधिका-यांनी त्यांचा रुजू अहवाल शासनास vinod.mendhe@nic.in या ईमेल संकेतस्थळावर त्वरीत सादर करावा.

४. संबंधित अधिकाऱ्याने पदोन्नतीच्या पदावर हजर न होता लोकप्रतिनिधीमार्फत पदस्थापनेत बदल करण्याबाबत शासनावर दबाव आणल्यास ते म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०३०८१९०४४६५२०१ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vijay K. Chaudhari
Date: 2019.03.11 11:42:48 +05'30'

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव.
४) आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध,पुणे-०७.
५) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, पुणे/मुंबई/अमरावती /औरंगाबाद /लातूर.
६) सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) उपआयुक्त पशुसंवर्धन (गुणनियंत्रण), गोरेगांव, मुंबई-६५.
८) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, ठाणे/सातारा/नाशिक/वाशिम/उस्मानाबाद/जालना./लातूर
९) महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पुणे/सातारा/नाशिक/वाशिम/उस्मानाबाद/जालना/ लातूर.
११) संबंधित अधिकारी,द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१२) निवडनस्ती-१.